दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS
● वर्ष १ ले ● अंक १८५ वा ● शनिवार २५ नोव्हेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 1 | Issue 185 | Date : 25/11/2023 | blow :Saturday | Page 4 | Price 4



**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८


## चीनमध्ये नव्या आजाराचा उद्रेक

नवी दिल्ली :चीनमधील बालकांमध्ये 'एच९एन२' (एव्हियन इन्फ्लूएंझा व्हायरस) आणि श्रवसनविकार यांचा उद्रेक झाला असल्याने करोनासारखाच या आजारांचा प्रसार होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. मात्र या आजारांचा भारताला धोका कमी असून केंद्र सरकारचे याकडे बारकाईने लक्ष असल्याचे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने शुक्रवारी सांगितले. या आजारांमुळे आपत्कालीन परिस्थिती उद्भवली तर त्यास लढा देण्यास तयार असल्याचे आरोग्य मंत्रालयाने सांगितले.



चीनच्या उत्तर भागांत काही बालकांना 'एच९एन२' आणि श्रवसनविकार यांचा प्रादुर्भाव झाला असून या आजारांचा मोठ्या प्रमाणात प्रसार होत असल्याचे वृत्त काही प्रसारमाध्यमांनी दिले. जागतिक आरोग्य संघटनेनेही याबाबत निवेदन जारी केले आहे. चीनमध्ये गेल्या महिन्यात 'एच९एन२'चा संसर्ग एका व्यक्तीला झाल्यानंतर हा संसर्ग वाढत गेला. या आजाराविरोधात लढण्यासाठी चीनमधील आरोग्य अधिकाऱ्यांची नुकतीच बैठक झाली असून याचा अहवाल जागतिक आरोग्य संघटनेला देण्यात आला आहे. 'एच९एन२'च्या संसर्गाचा प्रसार वेगाने होत नसून मृत्यूचे प्रमाणही कमी असल्याचे आढळले आहे, असे जागतिक आरोग्य संघटनेकडून सांगण्यात आले आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने शुक्रवारी सांगितले की, चीनमधील आरोग्य अधिकाऱ्यांनी बालकांमध्ये 'एच९एन२', मायकोप्लाझ्मा न्यूमोनिया आणि इन्फ्लूएंझा फ्लूच्या वाढत्या प्रकरणांसह अनेक संसर्गजन्य श्रवसनरोगांची नोंद केल्यानंतर या आजारांच्या वाढीबद्दल तपशीलवार माहिती चीनकडे मागितली आहे.

'डब्ल्यूएचओ'ने केलेल्या एकूण जोखीम मूल्यमापनात त्यांच्याकडे आतापर्यंत नोंदवलेल्या 'एच९एन२'च्या प्रकरणांमध्ये एका मानवाकडून दुसऱ्या मानवाकडे संसर्ग पसरण्याची शक्यता कमी आहे. त्याशिवाय या आजारांमुळे मृत्यू होण्याचे प्रमाणही कमी आहे.

# डिजिटल परिवर्तनात भारत पुढे, अर्थव्यवस्थेला मोठा फायदा

नवी दिल्ली : गेल्या काही वर्षांत भारत एक मोठी आर्थिक शक्ती म्हणून उदयास आला आहे. सध्या जगभरात सुरु असलेल्या डिजिटल परिवर्तनाच्या युगात देश खूप पुढे आहे. डिजिटल परिवर्तनाचा भारताच्या अर्थव्यवस्थेला मोठा फायदा होत आहे. लवकरच एकूण जीडीपीमध्ये डिजिटल अर्थव्यवस्थेचे योगदान २० टक्क्यांपर्यंत वाढू शकते.

केंद्रीय मंत्री राजीव चंद्रशेखर यांनी शुक्रवारी दिलेल्या माहितीनुसार, भारत ही केवळ जगातील सर्वात वेगाने





वाढणारी अर्थव्यवस्था नाही तर भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी डिजिटल अर्थव्यवस्था असल्याचे चंद्रशेखर म्हणाले. दिल्लीत आयोजित डिजिटल एक्सलेरेशन अँड ट्रान्सफॉर्मेशन एक्सपोमध्ये ते बोलत होते.

आतापर्यंत इतके योगदान दिले आहे. सध्या देशाच्या एकूण सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) डिजिटल अर्थव्यवस्थेचा वाटा ११ टक्के आहे. एकूण जीडीपीमध्ये डिजिटल अर्थव्यवस्थेचे योगदान लवकरच २० टक्क्यांपर्यंत म्हणजेच एक पंचमांश होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.काही दिवसांपूर्वी राजीव चंद्रशेखर । पान २ वर

### २०२६ साठी ही उद्दिष्टे

भारताला २०२७ पर्यंत ५ ट्रिलियन अर्थव्यवस्था बनवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. त्यासोबतच २०२६ पर्यंत देशाला जगातील ट्रिलियन डॉलर डिजिटल अर्थव्यवस्थांपैकी एक बनवण्याचेही लक्ष्य असल्याचे मंत्री चंद्रशेखर म्हणाले. आपण जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्थाच नाही तर सर्वात वेगाने वाढणारी डिजिटल अर्थव्यवस्था देखील असल्याचे ते म्हणाले.

## एकनाथ शिंदेंच्या 'हिंदुहृदयसम्राट' प्रचारफलकावरून वाद

मुंबई : राजस्थान विधानसभा निवडणुकीत भाजप उमेदवाराच्या प्रचारफलकावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा उल्लेख 'हिंदुहृदयसम्राट' असा करण्यात आल्याने नवीन वाद सुरू झाला आहे. या उल्लेखावरून आदित्य ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांनी टीकेची झोड उठविली आहे. हवामहल मतदारसंघातील भाजप उमेदवार बालमुकुंदाचार्य महाराज यांच्या प्रचारासाठी शिंदे गेले होते. त्यांच्या फलकावर शिंदे यांचा उल्लेख 'हिंदुहृदयसम्राट' असा करण्यात आला होता.त्यावरून उद्धव ठाकरे गट आक्रमक झाला असून आदित्य ठाकरे व खासदार राऊत यांनी टीका केली आहे. किती दिखाऊपणा करणार? काहीही केले, तरी गद्दारीचा शिक्का पुसला जाणार नाही आणि हे सरकार ३१ डिसेंबरनंतर जाणारच, असे ठाकरे यांनी स्पष्ट केले. सत्तेसाठी बेइमानी करणाऱ्यांना हिंदुहृदयसम्राट म्हणण्याची नवी परंपरा नव्या हिंदुत्वात सुरू झाली असावी. त्यांनी कोणते महान कार्य केले आहे, ते पाहिले पाहिजे, अशी टीका । पान २ वर





## रत्नागिरी जिल्ह्यातील ५० मंदिरांमध्ये ड्रेस कोड लागू करण्याचा निर्णय

रत्नागिरी : रत्नागिरी जिल्ह्यातील ५० मंदिरांमध्ये वस्त्र संहिता लागू करण्यात आली आहे. त्यामुळे आता भाविकांना मंदिरांमध्ये प्रवेश करताना कपडे परिधान करण्या संदर्भातले नियम पाळावे लागणार आहेत. अंग प्रदर्शन करणारे, अशोभनीय किंवा तोकडे कपडे घालण्यास या वस्त्रासंहितेनुसार बंदी असणार आहे. तशा प्रकारचे बोर्ड जिल्ह्यातल्या या मंदिरांच्या बाहेर लावण्यात येणार आहेत. मात्र, वस्त्रसंहितेबाबत गणपतीपुळे मंदिर प्रशासन अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही.

काही महिन्यांपूर्वी राज्यातील मंदिर, धार्मिक स्थळावर ड्रेस कोड लागू करण्याबाबत चर्चा सुरू झाली होती. काही ठिकाणी याची अंमलबजावणी झाली होती. तर, काही ठिकाणी हे नियम शिथील करण्यात आले होते. आता, मात्र, रत्नागिरीतील ५० मंदिरांमध्ये ड्रेस कोड लागू करण्यात आला आहे. कोकणात पर्यटनासोबत देवदर्शनासाठी जाणारे अनेकजण असतात. त्यातील काही जण पर्यटनासाठीच्या कपड्यांवर देवदर्शन घेतात. त्यानंतर आता ड्रेस कोड लागू करण्यात आला आहे. यापूर्वी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुणकेश्र्वर मंदिरानेदेखील असा निर्णय घेतला होता.

अंग प्रदर्शन करणारे, अशोभनीय किंवा तोकडे कपडे घालण्यास या वस्त्रासंहितेनुसार बंदी असणार आहे. तशा प्रकारचे । पान २ वर

# केंद्र शासनाच्या योजनांचा लाभ वंचित घटकापर्यंत पोहोचविणार

## उपमुख्य कार्यकारी अधिकारी शेळकंदे यांचे प्रतिपादन

*** जिल्ह्यात विकसित भारत संकल्प यात्रेस सुरुवात, आठ वाहनांच्या माध्यमातून जिल्ह्यात २६ जानेवारी पर्यंत प्रचार प्रसार मोहीम**

सोलापूर/प्रतिनिधीः केंद्र शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्यक्ष सर्वेक्षण करून वंचित घटकापर्यंत 'विकसित भारत संकल्प यात्रेच्या' माध्यमातून पोहोचविणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधीन शेळकंदे यांनी केले. केंद्र सरकारच्या विकसित भारत संकल्प यात्रेचा दक्षिण सोलापूर तालुक्यातील कारकल येथून काल शुभारंभ करण्यात आला.

यावेळी श्री शेळकंदे बोलत होते. व्यासपीठावर क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण, गटविकास अधिकारी बाळासाहेब वाघ, तालुका कृषी अधिकारी रामचंद्र माळी, उपसरपंच सिद्धाप्पा हंजगी, विस्तार अधिकारी पी. सी. पाटील, आर. एस. राठोड





ग्रामसेविका सुनीता राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी श्री शेळकंदे, म्हणाले ग्रामस्तरावर विविध योजनांची परिपूर्णता साधण्यासाठी या यात्रेच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. ही मोहीम सोलापूर जिल्ह्यात २६ जानेवारी २०२४ पर्यंत चालू राहणार आहे. यासाठी आठ वाहने केंद्र शासनाने परिपूर्ण उपलब्ध करून दिली आहेत. या मोहिमेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हळे यांनी वेळोवेळी मीटिंग घेऊन मार्गदर्शन केले असल्याचे त्यांनी सांगितले

चव्हाण म्हणाले, केंद्र शासनाच्या विविध योजनांसाठी पात्र असलेल्या परंतु अद्यापी लाभ न घेतलेल्या लाभार्थ्यांपर्यंत ही योजना पोहोचण्यात येणार आहे संभाव्य लाभार्थ्याची नोंदणी करणे नागरिकांशी वैयक्तिकचित्रफितीद्वारे संवाद साधून त्यांना योजनेबद्दल माहिती देणे या मोहिमेचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

वाघ म्हणाले, केंद्र शासनाच्या योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांनी आपल्या अनुभव देखील व्हिडिओच्या माध्यमातून शेअर करावेत जेणेकरून इतरांनाही त्यापासून प्रेरणा मिळेल योजनेची माहिती मिळेल तसेच नागरिकांना शासकीय । पान २ वर

### जिल्ह्यात आठ चित्र रथाद्वारे जनजागृती

विकसित भारत संकल्प यात्रे अंतर्गत जिल्ह्याच्या ग्रामीण व शहरी भागातील नागरिकापर्यंत केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती पोहोचवून योजनांचा प्रसार करण्यासाठी सोलापूर जिल्ह्यासाठी आठ चित्ररथ देण्यात आलेले असून याद्वारे जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती व महानगरपालिका नगरपरिषद, नगरपंचायतीच्या प्रत्येक वार्ड मध्ये चित्ररथ पोहोचून केंद्रीय योजनांची माहिती दिली जाणार आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पोहोचण्यासाठी जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागामार्फत नियोजन करण्यात आलेले आहे तर शहरी भागात चित्ररथ प्रत्येक वार्डापर्यंत पोहोचण्यासाठी जिल्हा नगरपालिका प्रशासन यांच्यामार्फत नियोजन करण्यात आलेले आहे.

# अंतर्गत दुफळींमुळे राजस्थानातील विधानसभा निवडणूक चुरशीची, आज मतदान

## काँग्रेस विरुद्ध भाजप थेट सामना

नवी दिल्ली : राजस्थानमध्ये शनिवारी मतदान होत असून परंपरा मोडून काँग्रेस सत्ता राखणार की, भाजप परिवर्तन करणार याची उत्सुकता असेल. काँग्रेस आणि भाजप या दोन्ही प्रमुख पक्षांमध्ये अंतर्गत दुफळी असल्याने ही निवडणूक अधिक चुरशीची झाली आहे. राजस्थान विधानसभेच्या २०० पैकी १९९ जागांवर शनिवारी मतदान होत आहे. करनापूर मतदारसंघात काँग्रेस उमेदवाराच्या निधनाने तेथील निवडणूक पुढे ढकलण्यात आले आहे.मध्य प्रदेशप्रमाणे राजस्थानमध्येही दोन्ही पक्षांनी लोकप्रिय घोषणांची उधळण केली आहे.

काँग्रेसने सात आश्र्वासने दिली असून एक कोटी कुटुंबाना ५०० रुपयांमध्ये गॅस सिलिंडर, महिला कुटुंबप्रमुख असलेल्या कुटुंबांना वार्षिक दहा हजारांचे आर्थिक साह्य, गोधन योजनेमध्ये २ रुपये प्रति किलो शेळखरेदी, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना पहिल्या वर्षी मोफत लॅपटॉप, इंग्रजीमध्ये शिक्षण, आपत्तीमुळे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी १५ लाखांचा विमा, सरकारी कर्मचाऱ्यांसाठी जुनी निवृत्ती योजना अशा योजनांचा समावेश आहे. गेल्या पाच वर्षांतील गेहलोत सरकारचा कथित भ्रष्टाचार, दलित व महिलांवरील अत्याचार, गो-तस्करी, मुस्लिम अनुनय आदी मुद्दय़ांवरून भाजपने प्रचारामध्ये काँग्रेसवर हल्लाबोल केला आहे.

गेहलोत यांचा मुलगा वैभवविरोधात ईडीद्वची चौकशी केली जात आहे. गेहलोत सरकारमधील तत्कालीन मंत्री राजेंद्र गुढा यांनी विधानसभेत दाखवलेल्या लाल डायरीवरूनही पंतप्रधान नरेंद्र मोदींसह इतर भाजपनेत्यांनी गेहलोत यांना घेरले आहे. लाल डायरीमध्ये गेहलोत सरकारच्या भ्रष्टाचाराच्या नोंदी असल्याचा दावा गुढा यांनी केला होता. काँग्रेसमधील अंतर्गत मतभेदांवरून भाजपने राजकीय लाभ मिळवण्याचाही प्रयत्न केला. अशोक गेहलोत व सचिन पायलट यांच्यातील मतभेद पूर्णपणे मिटले नसल्याचे दिसते. पायलट यांना मुख्यमंत्री न केल्यामुळे नाराज गुर्जर मतदार भाजपकडे वळण्याची शक्यता आहे. जाटांच्या हितासाठी गेहलोतांनी काहीच न केल्याचा आरोप जाट समाजाकडून केला जात आहे. राजस्थानमधील दोन प्रमुख समूहांच्या नाराजीचा फटका काँग्रेसला बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिन ४ डिसेंबर रोजी

सोलापूर/प्रतिनिधीः जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे सोमवार दिनांक ४ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे यांनी दिली. या लोकशाही दिनात मागील महिन्यातील प्रलंबित निवेदन व अर्ज, माहिती अधिकार अधि.-२००५ अंतर्गत प्राप्त अर्ज, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही याबाबत निपटारा करण्यात येणार आहे. तसेच नागरिकांच्या लोकशाही दिनातील अर्जावरही कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे यांनी दिली.




# संपादकीय

## दुसरे कुठलेही नाही...

ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये भाजप आणि त्यांचे दोन मित्रपक्ष असलेले एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस यांची सरशी झालेली दिसली. आम्ही राज्यात ग्रामपंचायत निवडणुकीत नंबर एकचा पक्ष झाल्याचा दावा करत भाजपने विजयाचा जल्लोष साजरा केला. भाजपसोबत शिंदे यांनी हातमिळवणी केली म्हणून भाजपची सत्ता राज्यात आली. आपल्यासोबत अजित पवार आणि त्यांच्या समर्थकांना आणल्यानंतर भाजपच्या नेत्यांना मोठा आनंद झाला. त्यामागे एक मुख्य कारण होते ते म्हणजे अजितदादांना आपल्याकडे खेचून भाजपने राज्याच्या राजकारणातील मातब्बर नेते शरद पवार यांची ताकद कमी करण्यात यश मिळवले आहे. कारण २०१९ ची विधानसभा निवडणूक आपण अगदी सहज जिंकू, असे भाजपला वाटत होते, तसेच राष्ट्रवादीचे बलशाली नेते फोडून आपल्याकडे घेण्यात भाजपने यश मिळवले होते. यामुळे राज्यातील राजकीय समीकरणे बदलले. अशा वेळी शरद पवारांनी राज्यात प्रचाराची एकाकी झुंज देऊन मोठ्या प्रमाणात जागा जिंकून आणल्या होत्या. शिंदे यांना आपल्यासोबत घेऊन भाजपने उध्दव ठाकरे यांना कमकुवत केले, तसेच भाजपने अजितदादांना सोबत घेऊन पवारांची ताकद कमी केली. भाजपला शिंदे आणि अजितदादा हे दोघे आपल्यासोबत आल्यामुळे आपली ताकद वाढली असे वाटत आहे, पण त्यांनी अस्तित्व वेगळे ठेवलेले आहे. त्यामुळे हे दोन गट जसे बळकट होतील तसे निवडणुकीच्या वेळी तिकिटांवरील त्यांची दावेदारीही तितकीच बळकट होणार आहे. त्यामुळे त्यांना सामावून कसे घ्यायचे हे भाजपसमोर आव्हान असेल. सत्ता तर मिळाली, पण मुख्यमंत्रिपद हे पाहुण्यांना बहाल करावे लागत आहे ही भाजपची वेदना आहे, पण ती कळ सोसून त्यांना पुढे चालावे लागत आहे. भाजपकडे अजितदादा आणि शिंदे हे दोन पर्याय आहेत. अजितदादा आणि शरद पवार गट यांच्यातील सख्ख्य पाहता आणि पवारांची संयुक्त कुटुंब पध्दती पाहता अजितदादा हे परत गेले तर त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सहज सामावून घेतले जाऊ शकते, पण शिंदे यांची परिस्थिती तशी नाही. त्यांनी परतीचे दोर कापून टाकले आहेत. त्यामुळे त्यांनी त्यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाणे येथील एका कार्यक्रमात आपली 'मन की बात' सांगताना म्हटले की, राजकारणात काही सांगता येत नाही, काहीही होऊ शकते. म्हणून आम्ही गॅसवर असतो. शिंदे यांचे हे वाक्य अगदी बरोबर आहे. कारण राजकारणासारखे अनिश्चित क्षेत्र दुसरे कुठलेही नाही.

# संविधानाचा स्विकार झाला पुढे काय..?

हजारो वर्षांपासून चालत आलेल्या विषमता, अन्याय, मानवी गुलामी व एकाच वर्षाच्या अधिपत्याखाली असलेली व्यवस्था उलथून टाकुन समता, न्याय, मानवी स्वातंत्र्य मिळवून देशाच्या प्रत्येक नागरिकास समान दर्जा, समान संधी निर्माण करून देऊन प्रत्येकाला देशाच्या राज्यकारभारात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभागी होण्याचा अधिकार बहाल करून माणवाच्या जिवनाचे कल्याण करणारे जगातील एकमेव आदर्श संविधान जगातील सर्वात विद्वान महापुरुष बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अथक परिश्रमाने, तब्येची काळजी न करता, देशातील कोणत्याही नागरिकांवर संविधानीक पद्धतीने अन्याय होणार नाही, एखादा ही घटक चुकुनही विकासासाठी दूर राहणार नाही याची काळजी घेऊन दोन वर्षे, अकरा महिने, अठरा दिवस संविधान लिहुन संविधान समीती समोर ते मांडून बऱ्याच लोकांनी विरोध करून बरेच मुद्दे जनकल्याणाचे आहेत हे आपल्या बुद्धीमत्तेच्या जोरावर संविधान समितीला पटवून देऊन ते मान्य करून घेतले व आदर्श असे संविधान ज्या मध्ये देशाचा व देशातील जनतेचा सर्वांगीण काया पालट होईल अशी व्यवस्था निर्माण करणारे संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान समीतीकडे सुपुर्द करून जनतेच्या वतीने संविधान समितीच्या सदस्यांनी आदर्श संविधानाचा स्विकार केला आणि जनतेला समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्याच्या माध्यमातून सोन्याचे दिवस जर संविधानाची अंमलबजावणी झाली तर येतील असे वक्तव्य तत्कालीन विद्वान लोकांनी केले होते. संविधानाचा स्विकार जनतेच्या वतीने त्यावेळच्या प्रतिनिधींनी केला परंतु आजही जनता संविधानाचा नैतिक पातळीवर स्विकार करून प्रचार आणि प्रसार करताना दिसत नाही हि खरी शोकांतिका आहे. अपवाद वगळता भारतीय लोक संविधानाचे वाचन करून समजून घेत नाहीत, स्वतः ला अभ्यासु व हुशार समजणाऱ्या लोकांनी जर संविधान वाचले नसेल, ते समजून घेतले नसेल, किंवा त्याच्या डोक्यात आजही एकच विचार असेल कि संविधान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले व त्यामुळे एकाच जातीचा विकास झाला तर तो व्यक्ती देशातील सर्वात बुद्धीहीन व देशद्रोही व्यक्ती होय. कारण देशाचे संविधान समजून न घेता, त्याचा अभ्यास न करता आणि केवळ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले, आणि एकाच जातीसाठी लिहले असा पुर्वग्रह डोक्यात असलेल्या व्यक्ती राष्ट्रप्रेमी होऊच शकत नाही. संविधान न वाचणारा, संविधान घरात न आणणारा, व संविधान आणि संविधान निर्माते यांचे नाव घेताना कमीपणा वाटणारा व्यक्ती देशद्रोहीच आहे. मग तो स्वतः ला किती ही हुशार, विद्धान समजत असेल पण त्याची विद्वता शुन्य आहे. कारण ज्याला देशाचे संविधान व देशाचे उद्धारक कळत नसतील तर त्या व्यक्तीला बुद्धीचा पत्ताच नाही असे माझे वैयक्तिक मत आहे. संविधानाची उद्देशिका बघितली संविधानाची महती लक्षात येते परंतु ज्यांना वाचले कळत नाही त्यांना विद्वान म्हणणे म्हणजे स्वतः ही वैचारिक मागास असल्याचे सिद्ध होते. कारण उद्देशिके मध्येच स्पष्ट नमुद केले आहे. सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही घडवण्याचा व नागरिकांना सामाजिक, आर्थिक, राजनैतिक- न्याय, विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा व उपासना चे- स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची - समानता निश्रि्चत पणे प्राप्त करून देण्याचा, आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता यांचे आश्र्वासन देणारी- बंधुता, प्रवर्धित करण्याचा संकल्प पुर्वक निर्धार करून आमच्या संविधान सभेत तारखेसह अंगिकृत करण्याचे वचन देशातील जनतेला दिलेले आहे. याचाच अर्थ संविधाना पुर्वी देशात न्याय, स्वातंत्र्य, समानता व बंधुता नव्हती हे उघड होते. आणि संविधानाने आपल्याला एकसंघ करून सर्व काही मिळवून दिले. प्रत्येक नागरिकांना आवश्यक असलेले मुलभूत अधिकार बहाल करून त्यांच्या जिवनात वैचारिक व सामाजिक उर्जा भरण्याचे काम केले गेले. समानतेचा, स्वातंत्र्याचा, शोषणाविरूद्धचा,धर्मस्वातंत्र्याचा व सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क देऊन त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी संविधानाने करून ठेवली आहे. ह्या मुळे जनतेला जगायला बळ मिळालेच परंतु जनतेचा खरा विकास हा संविधानाचा भाग चार यामुळे झाला आहे. भाग चार मध्ये मार्गदर्शक तत्वांचा समावेश करून नागरिकांना सोन्याचे दिवस येतील अशी व्यवस्था केली आहे. सत्तेत असलेल्या लोकांना वेगळे असे काहीच करण्याची गरज नाही, किंवा सत्तेत बसलेल्या लोकांनी जनतेसाठी काही एखादी योजना सुरू करून विकासाच्या प्रवाहात आणण्याचे प्रयत्न केले तर ते सरकारचे उपकार नसुन सरकारची जबाबदारी आहे. आणि ते संविधानाचे उपकार आहेत हे विसरून चालणार नाही. शिक्षण देताना कोणताही भेदभाव न करता स्त्रि पुरूषांना शिक्षण घेण्याचा हा त्यांचा मुलभूत अधिकार आहे तो कोणीच बदलु शकत नाही. परंतु शिक्षणा नंतर किंवा काही घटक शिकलेला नाही तरीही त्या घटकासाठी सरकारने अर्धात संविधानीक शब्द म्हणजे राज्याने कलम ३९ (क) नुसार स्त्रि पुरुषांना रोजगाराची समान संधी उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. परंतु लोकांनी संविधान वाचले नाही म्हणून लोकांना संविधान कळाले नाही आणि राज्याकडे नैतिकता, प्रामाणिक पणा व जनकल्याणाचा विचार नसल्याने राज्य जनतेची लुट करत करते. जसे रोजगार हमी योजना हे कलम ३९ क चा परिणाम आहे. परंतु रोजगार हमी अर्ध्यात तुम्ही अर्ध्यात आम्ही आणि काही वर्षांपासून बऱ्याच भागातून ही योजना ही गायब झाली. परंतु लोकांना रोजगाराचे संसाधन व समान संधी उपलब्ध करून देण्याची नैतिक जबाबदारी राज्याची आहे. एखाद्या राज्याने एखाद्या कामाच्या ठिकाणी संधी निर्माण करून दिली असेल तर कलम ३९ (घ) नुसार राज्य पातळीवर समान कामाला समान वेतन देण्याची तरतुद ही केली आहे. मग ते काम शासकीय, निमशासकीय कोणत्याही पातळीवर असो. म्हणून शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांना समान कामासाठी समान वेतन व भत्ते दिले जातात त्या ठिकाणी कोणताही भेदभाव केला जात नाही. हे उपकार संविधानाचेच आहेत. कलम ३९ इ नुसार स्त्रि पुरुष यांच्या आरोग्य व ताकद याचा दुरूपयोग करता येणार नाही आणि बालकांच्या कोवळ्या वयाचा दुरूपयोग करता येणार नाही, म्हणजेच कोणत्याही कामाच्या ठिकाणी कोणत्याही स्त्रि पुरुष यांना अवघड, जड व जिवापेक्षा वरचड काम सांगता येणार नाही, आर्थिक परिस्थिती आणि कामाची गरज याचा गैरफायदा कोणालाही घेता येणार नाही म्हणून कामगारांना संरक्षण दिले. संविधानाचे कलम क्रमांक ४१ चा विचार केला तर आपल्या लक्षात येईल की संविधानाने लहानातील लहान घटक सुद्धा दुर्लक्षित होऊ दिला नाही. कारण कलम ४१ नुसार कामाचा, शिक्षणाचा हक्क राखुन तर ठेवलाच आहे परंतु वृद्ध लोक, विकलांग, आणि अपराध नसताना एखाद्या व्यक्तीच्या वाट्याला हलाखिचे जिवन आले असेल तर त्यांना अर्थ साह्य करण्याची तरतूद संविधानामध्ये केलीली आहे. जनप्रतिनिधी अर्थात जनसेवकांना केवळ त्याची अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. याच कलमाचा आधार घेऊन शैक्षणिक कार्यास हातभार लागावा म्हणून सारथी, महाज्योती सारख्या संस्था निर्माण करून ओबिसी व मराठा तरुणांना शिक्षणासाठी आर्थिक साह्य केले जाते हि संविधानाची देण आहे. वृद्ध व निराधार लोकांना दरमहा मासिक अर्थ साह्य, विकलांग व्यक्तीला व्यवसायासाठी आर्थिक साह्य, व त्यांना काही उपकरणे, मासिक आर्थिक साह्य जे काही मिळते ते कलम ४१ नुसार मिळते. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, वृद्ध व विकलांग लोकांना उदरनिर्वाहा साठी सरकार ला नवीन काहीच करायची गरज नाही फक्त संविधानात आहे तेच त्या गरजू लोकांना देण्याचे काम प्रामाणिकपणे करणे आवश्यक आहे. कलम ४३ नुसार राज्याने नागरिकांना पेन्शन ची व्यवस्था करून देण्यात यावी व काम करताना कामगारांना, कर्मचाऱ्यांना त्यांना त्यांचे जिवन जगताना सामाजिक व सांस्कृतिक जिवन जगता यावे अशा पद्धतीने कामाची व्यवस्था करावी अशी तरतुद करून दिली आहे. याचा अर्थ कामगारांना व कर्मचाऱ्यांना निर्वाह वेतन तर मिळायच पाहिजे परंतु दैनंदिन जिवन जगताना त्याचे जे सामाजिक व सांस्कृतिक जिवन आहे तेही जगता आले पाहिजे हे संविधानानेच करून दिले आहे. म्हणून काम करताना काही पगारी सुट्या ह्या शासकीय पातळीवर व काही पगारी सुट्या ह्या वैयक्तिक पातळीवर मिळतात हि संविधानाची देण आहे. दिवाळी, दसरा, इद, ख्रिसमस ला कर्मचाऱ्यांना सुट्टी देऊन त्यांना त्यांच्या संस्कृती ची जोपासना करण्याचा अधिकार संविधानाचे दिलेला आहे. एखाद्या वेळी एखाद्या कर्मचाऱ्यांना बायको सोबत फिरायला जाने, मित्र मैत्रिणीच्या लग्नाला जाणे, नातेवाईकांच्या सुख द:खाच्या कार्यक्रमात जाने यासाठी कर्मचारी पगारी सुट्टी घेऊन जातात. हे उपकार केवळ आणि केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधानाचे आहेत. एवढे आदर्श संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्विकृत करून लोकांना सोन्याचे दिवस दिले. परंतु संविधानाचा स्विकार, संविधानाचे फायदे घेणारे लोक संविधाना प्रती संवेदनशील नसतील आणि संविधान न वाचता समजून घेत नसतील आणि संविधानाला एकाच जातीची संपती समजून आपल्या विद्वतेचे प्रदर्शन करत असतील तर यांना संविधान साक्षर करणे आवश्यक आहे. संविधानाचा स्विकारा सोबतच संविधानाचा प्रचार प्रसार करणे खुप आवश्यक आहे. म्हणून सर्वांनी एकजूट होऊन संविधानाची योग्य मांडणी करून संविधान राष्ट्रीय ग्रंथा सोबतच प्रत्येक नागरिकांच्या उद्धाराचे माध्यम आहे. याबद्दल जागृती करून संविधान मना मनात पोहचवण्यासाठी प्रयत्न केला तरच आपण खरे भारतीय आहोत. अशी ओळख निर्माण होईल. संविधानाच्या सर्वच लाभार्थ्यांना संविधान दिनाच्या मंगलमय सदिच्छा..

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

## डिजिटल परिवर्तनात

यांनी एका कार्यक्रमात दावा केला होता की २०२६ पर्यंत एकूण जीडीपीमध्ये डिजिटल अर्थव्यवस्थेचे योगदान २० टक्क्यांपर्यंत पोहोचू शकते. तेव्हा त्यांनी सांगितले होते की २०१४ मध्ये जीडीपीमध्ये डिजिटल अर्थव्यवस्थेचे योगदान केवळ ४.५ टक्के होते, जे आता सुमारे ११ टक्के झाले आहे.

राजीव चंद्रशेखर यांच्या मते, आजकाल डिजिटल अर्थव्यवस्था सामान्य अर्थव्यवस्थेपेक्षा कितीतरी पटीने जास्त वेगाने प्रगती करत आहे. व्यापक डिजिटल अर्थव्यवस्थेचा आणि विशेषत: नाविन्यपूर्ण अर्थव्यवस्थेचा विकास दर उत्कृष्ट आहे. त्यांच्या वाढीचा वेग नियमित अर्थव्यवस्थेपेक्षा जवळपास ३ पट जास्त आहे.

## एकनाथ शिंदेंच्या 'हिंदुहृदयसम्राट'

राऊत यांनी केली आहे.

बाळासाहेबांच्या राजकीय आणि हिंदुत्ववादी विचारांचे वारसदार शिंदे आहेत. ते कधीही स्वत:ला हिंदुहृदयसम्राट म्हणवून घेत नाहीत व घेणारही नाहीत. कोणीही तेवढे मोठे नाही.बाळासाहेब हे आमचे दैवत आहेत, असे प्रत्युत्तर शिंदे गटातील नेते व मंत्री शंभुराज देसाई यांनी दिले आहे. शिंदे यांनी बाळासाहेबांचे विचार आणि हिंदुत्वासाठी मोठा निर्णय घेतल्याने कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या असाव्यात. पण त्याचे राजकारण व बाऊ करणे गैर असल्याचे ज्येष्ठ भाजप नेते व मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी नमूद केले आहे.

## केंद्र शासनाच्या योजनांचा लाभ

योजनांची माहितीसाठी जिल्हा ते गाव गावपातळीवरती चित्र चित्रकथाद्वारे जिंगल पोस्टर्स छायाचित्र ध्वनी चित्रफीत आदी माध्यमातून प्रत्यक्ष प्रसिद्धी करण्यात येत आहे याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आव्हाने त्यांनी केले.

यावेळी उपस्थितांना आपला संकल्प विकसित भारत याबाबत शपथ देण्यात आली. शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या आयुष्मान भारत, पीएम गरीब कल्याण योजना, दीनदयाल अंतोदय योजना, पंतप्रधान आवास योजना, पीएम उज्वला योजना, पीएम किसान सन्मान योजना,पोषण अभियान, जल जीवन मिशन,खेड्यात सुधारित तंत्रज्ञान सह मॅपिंग, जनधन योजना, जीवन ज्योती विमा योजना, पीएम सुरक्षा विमा योजना , अटल पेन्शन योजना, इत्यादी योजना बाबत माहिती देण्यात आली. सदरील कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी मंडळ कृषी अधिकारी शिल्पा कसबे, केव्हीके शास्त्रज्ञ अमोल शास्त्री, वैद्यकीय अधिकारी डॉ. शेखावत, विदर्भ कोकण बँकेचे मॅनेजर मिलिंद जयकर प्रगतशील बागायतदार महालिंगअप्पा बिराजदार आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी वेगवेगळ्या योजनेच्या लाभार्थ्यांना लाभाचे वाटप देखील करण्यात आले.

## ५० मंदिरांमध्ये ड्रेस कोड

बोर्ड जिल्ह्यातल्या या मंदिरांच्या बाहेर लावण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र मंदिर महासंघाचे समन्वयक सुनील घनवट यांनी दिली आहे. यानंतर देखील कुणीही भाविक अजाणतेपणे तोकडे किंवा अशोभनीय कपडे घालून आल्यास त्या महिला किंवा पुरुष यांना विनंती करून इतर काही कपडे दिले जाणार आहेत. गणपतीपुळे मंदिरासोबत देखील याबाबत बोलणे झालेले आहे. पण वस्त्रासहितेबाबत गणपतीपुळे मंदिर प्रशासन अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही. काही दिवसांमध्ये या संदर्भातला निर्णय अपेक्षित असल्याची माहिती घनवट यांनी दिली आहे.

# पॅराग्लाइडर्स, मायक्रोलाइट एअर क्राफ्ट, ड्रोनच्या वापरावर बंदी

मुंबई : राष्ट्रीय हिताला बाधा पोहोचविणाऱ्या तसेच राष्ट्रद्रोही कारवायांसाठी कारणीभूत ठरतील, असे घटक जसे पॅराग्लाइडर्स, रिमोट कंट्रोल्ड मायक्रोलाईट एअरक्राफ्ट, ड्रोन, पॅरा मोटर्स, हॅण्ड ग्लायडर्स, हॉट एअर बलूनच्या उड्डाण क्रियांना बंदीचे आदेश बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत १८ डिसेंबर २०२३ पर्यंत लागू करण्यात आले आहेत, असे पोलीस उपायुक्त, विशाल ठाकूर यांनी कळविले आहे.मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात कुठेही कायदा व सुव्यवस्था बिघडणार नाही, सामान्य जनतेला आणि अति महत्त्वाच्या व्यक्तींना धोका निर्माण होणार नाही, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होऊ नये याकरीता हे आदेश लागू आहेत. मुंबई पोलिसांकडून हवाई पाळत ठेवणे




किंवा पोलीस उप आयुक्त (अभियान), बृहन्मुंबई यांच्या लेखी विशिष्ट परवानगीने करण्यात येणारी अपवाद राहील, असेही या आदेशामध्ये स्पष्ट केले आहे.या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय दंड संहितेच्या कलम १४४ अन्वये कारवाई करण्यात येईल.

# आरोग्य विभागातील 'सीएसआर' निधीच्या विनियोगासाठी धोरण : प्रा.डॉ.तानाजी सावंत

मुंबई : आरोग्य विभागाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कॉर्पोरेट क्षेत्र महत्त्वाचा वाटा उचलू शकते. त्यासाठी कॉर्पोरेट संस्थासुद्धा पाठिंबा देण्यास इच्छुक आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी अर्थात सीएसआर क्रियाकलापांची जलद, पारदर्शक व प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता धोरणात्मक संरचना तयार करण्यात येत आहे. सीएसआर निधीच्या विनियोगासाठी धोरण ठरविण्यात येणार आहे, अशी माहिती, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी दिली.

सीएसआर निधीच्या विनियोगाबाबत मार्गदर्शक सूचनाही जारी करण्यात आल्या आहेत. आरोग्य मंत्री डॉ. सावंत यांच्या संकल्पनेतून हे धोरण तयार करण्यात आले आहे. सीएसआर निधीचा आरोग्य विभागाच्या बळकटीकरणासाठी अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उपयोग व्हावा, या करीता असे कुठलेही धोरण आतापर्यंत नव्हते.

केंद्र शासनाच्या कंपनी कायद्यानुसार, पात्र कॉर्पोरेट संस्था त्यांचा सीएसआरचा निधी आरोग्य विभागांतर्गत प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेला प्रोत्साहन देणे, पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करून देणे, औषध क्षेत्रातील इनक्युबेटर किंवा संशोधन आणि विकास प्रकल्पांसाठी योगदान, आयुर्वेद, योग आणि निसर्गोपचार, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथीमध्ये संशोधन करण्यास योगदान, सार्वजनिक आरोग्य विभागाला दर्जेदार, न्याय्य आणि किफायतशीर सेवा प्रदान करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी घेणे व्यवहार्य आहे.



सीएसआर अंतर्गत उपक्रम हाती घेण्यासाठी धोरणात्मक आणि कायदेशीर चौकट विकसित करणे, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीच्या माध्यमातून राज्यातील सार्वजनिक आरोग्याशी विविध उपक्रमांची अंमलबजावणी करणे, कॉर्पोरेट भागीदारांच्या कौशल्याचा वापर करून आरोग्य सेवांचा दर्जा वाढवणे, विभागाच्या आवश्यकतेनुसार कार्यशाळा, परिषदा, एक्सचेंज प्रोग्रॅम आदी कार्यक्रम आयोजित करणे, दुर्गम भागात असलेल्या आरोग्य सुविधांना सहकार्याचा लाभ मिळावा यासाठी राज्य पातळीवर समन्वय साधणे ही या धोरणाची व्याप्ती आणि वैशिष्ट्ये आहेत. धोरणानुसार, प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागसलेल्या गटांना भेडसावणाऱ्या समस्या कमीत कमी करून उपाययोजनेचे समर्थन करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य प्रणालीमध्ये तसेच त्यांच्या वितरणामध्ये सुधारणा करण्यात येत आहे.

राज्यात कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी अंतर्गत आरोग्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नियामक समिती, विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती, आरोग्य सेवा आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समन्वय समिती, सहसंचालक (रुग्णालये) आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सीएसआर समन्वयक कक्ष, उपसंचालक यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय स्तरावरील सीएसआर समिती, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावरील सीएसआर समिती असणार आहे. या समित्यांच्या कार्यपद्धती व जबाबदारी निश्रि्चत करण्यात आली आहे. या धोरणामुळे राज्यात आरोग्य विभागात सीएसआरच्या निधीचा प्रभावी उपयोग होणार असून आरोग्य सेवा, सुविधा अधिक बळकट होतील, असा विश्र्वासही आरोग्य मंत्री प्रा. डॉ. सावंत यांनी व्यक्त केला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# सविधान म्हणजे मानवमुक्तिचा जाहीरनामा : जगदीश ओहोळ




आटपाटीः फुले शाहू आंबेडकर विचार मंच आटपाडी यांच्या वतीने संविधान जनजागृती सप्ताह निमित्त होते पुष्प सुप्रसिद्ध व्याख्याते जगदीश ओहोळ सर यांनी गुंफले पुढे म्हणाले आरक्षण म्हणजे प्रतिनिधित्व आहे. अस्पृश्यतेची लस देण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. बाबासाहेबांच्या निर्मितीचे प्रतिबिंब सविधान आहे.सविधान हा मानव मुक्तीचा जाहीरनामा आहे. संविधानाच्या प्रस्ताविकेतला प्रत्येक शब्द भारताचा आराखडा आहे. आरक्षण खैरत नाही तर एक संधी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृती जाळून संविधान हा पर्याय दिला. संविधानाच्या अगोदर काय परिस्थिती होती,यांचा विचार केला तर सविधानाचे महत्त्व कळेल ओबीसी व महिलांसाठी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा देणारे भारत देशातील एकमेव डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाभिमानी नेते होते.

पुतळे कधी क्रांती करत नसतात तर पुतळ्याकडे बघून क्रांती करायची असतें असे स्पष्ट मत ओहोळ यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले माजी शिक्षणाधिकारी ज्ञानदेव जावीर साहेब यांनी राजकीय आरक्षणातील हिस्सेदारी व बॅकलोग याविषयी आकडेवारी सहित स्पष्ट केले. स्वागताध्यक्ष राजेंद्र बापू खरात यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले.व कार्यक्रमाचा थोडक्यात आढावा सांगितला. दरम्यान कार्यक्रमाची सुरुवात पोलीस आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व संविधान प्रस्ताविका वाचन करून करण्यात आले. सर्व प्रमुख उपस्थित मान्यवरांचे सत्कार संविधान प्रति व सन्मानचिन्ह देऊन विचारमंचचे अध्यक्ष राजेंद्र (बापू) खरात यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रस्तावित गणेश ऐवळे सर यांनी केले.तर आभार प्रदर्शन शोभा विलास धांडोरे यांनी केले. या कार्यक्रम प्रसंगी पांडुरंग ऐवळे साहेब, दत्तात्रय कांबळे, नारायण जावीर, सतिश करडे सर,विकास मोटे, संजय मोटे, रणजित ऐवळे, विशाल काटे, सनी पाटील सर, किरण सोहनी सर, स्वप्निल सावंत, जनार्दन मोटे सर, शरद वाघमारे, समाधान खरात, राजेश मोटे, नितीन तोरणे प्रशांत चंदनशीवे,चंदन बाबर, मारुती ढोबळे, सुष्मिता मोटे, कविता खरात, प्रतिभा सावंत,पुनम ऐवळे, रविंद्र माने, आदित्य सातपुते, चंद्रकांत ऐवळे, यांच्यासह विविध भागातून महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माणसा माणसातील संबंध प्रेम, करुणाऱ्या तत्त्वानुसार जोडणाऱ्या बौद्ध धर्माचा मध्यवर्ती सिद्धांत समता विषयावर प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न

छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधीः समाज जीवनात कार्यरत फुले शाहू आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना, जनतेला जागृत करण्यासाठी २५ नोव्हेंबर १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुलगंध कुटी, सारनाथ येथे म्हटल्याप्रमाणे माणसा माणसातील संबंध प्रेम, करुणा या तत्त्वानुसार जोडणा–या बौद्ध धर्माचा मध्यवर्ती सिद्धांत समता आहे. या विधानाची प्रासंगिकता लक्षात घेऊन विधानाच्या ६७ व्या वर्धापनदिनानिमित्त या ज्वलंत विषयावर बामसेफ अंतर्गत फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने जनसंपर्क कार्यालय : द्वारा बी. बी. मेश्राम, साकेत नगर (पेठे नगर), छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. जेणेकरून फुले शाहू आंबेडकराईट चळवळीचे संघटनात्मक कार्यात वृद्धी होऊ शकेल.

या कार्यशाळेचे उदघाटन तथागत मासिकाचे कार्यकारी संपादक प्रा. अरुण कांबळे म्हणाले की, मुलगंध कुटी येथे पंच वर्गीय भिक्कुना संदेश दिला होता. बुद्धाच्या विचाराच्या प्रचार प्रसारासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रयत्नशील होते. जगाला शांततेची गरज आहे करिता आपण डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या बुद्ध की कार्ल मार्क्स, जाती निर्मुलन, भारताचे संविधान आणि सारनाथ येथील भाषण समजून घेण्याची नितांत आवश्यकता आहे. ज्यामुळे मानवीय समाज निर्माण होऊ शकेल. समाजातील डाक्टरेट झालेले उच्च शिक्षित व्यक्ति येथे राहतात पण ते सुखी नाहीत कारण लोकशाहीत माणसे समान झालीत पण कागदावर होय, प्रत्यक्षात काय? परिणामी समाजात सामाजिक लोकशाही निर्माण झाली नाही तर त्यापासून त्रस्त व्यक्ती राजकीय लोकशाहीचा डोलारा उध्वस्त करतील. राजकीय सत्ता ही सर्व समस्यांची गुरूकिल्ली आहे, ती नीट सांभाळली पाहिजे. अठरापगड जातीतील लोकांना सामावून घेतले पाहिजे. भारताचे संविधानानुसार समता, ममता, करुणा निर्माण केली पाहिजे.




याप्रसंगी अँड. विलास रामटेके म्हणाले की, धम्मेक स्तुपासमोर डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा सत्कार करण्यात आला होता. जसे समुद्रात विलिन झाल्याने सर्व नद्यांचे अस्तित्व संपुष्टात येते. तसेच धम्मात आल्याने सर्व जातींचे अस्तित्व संपुष्टात येते. प्रसेनजित राजाला मुलगी झाल्याचे कळल्यावर त्यांचा चेहरा पडला होता. ही लिंगभेदरेषा आपणास संपुष्टात आणावी लागेल. जगातील एका माणसाने दुसऱ्या माणसांशी उचित व्यवहार करने म्हणजे धम्म होय. हिरामण अहिरे म्हणाले की, भारतात प्रतिक्रांती झाल्यावर धम्माचा अस्त झाला आणि जगाला बुद्धाची गरज भासली. जगातील प्रगतीशील राष्ट्रात लिंगाधारित समता सुद्धा पहायला मिळते. मात्र आपल्या देशात ज्ञानापासून जनतेला दूर ठेवण्यासाठी प्रयत्न केला जातो, हे धोकादायक आहे.

प्रमुख वक्ते धनराज गोंडाणे म्हणाले की, विचारमंथन करने ही एक चांगली बाबआहे. वैदिक संस्कृतीने भेदाभेद निर्माण केलेत, ज्याचे दुष्परिणाम आपल्यावर होत आहेत. नंतर प्रज्ञा, शील, करुणा, समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्यायावर आधारित श्रमण संस्कृती पुढे आली. जे तत्त्वज्ञान डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धाकडून स्विकारले. महिलांचा भिक्खू संघात समावेश होणे ही एक महत्वपूर्ण क्रांती आहे. गरीब श्रीमंतातील दरी नष्ट करताना माणसांनी माणसाशी माणसाप्रमाणे वागले पाहिजे. मानवतावाद हाच धम्म आहे.

या कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, अनेक जण दोन दोन कोटीचे बंगले बाधतात पण करुणा शून्य जीवन जगतात, अशावेळी समाजात समता कशी प्रस्थापित होईल? डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीच्या यशस्वी कामकाजाच्या पूर्वावर्ती शक्ती समजावून सांगताना पहिली अट ही समाजातून विषमतावाद अर्थात ब्राह्मणवादाचे उच्चाटन सांगितले आहे तर विरोधी मतप्रवाहाचे अस्तित्व मान्य करने ही द्वितीय अट सांगितली आहे. याचे अनुपालन केले तरच समता प्रस्थापित होऊ शकेल, म्हणून आपण तसा प्रयत्न केला पाहिजे. बुद्ध कबीर भीमराव फुले, त्यांनी जनजीवन फुलविले असे वामनदादा कर्डक म्हणाले होते. करिता ख–या अर्थाने बुद्धत्वावर आपण विचार केला पाहिजे. जेणेकरून समाजात समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्यायावर आधारित समाजव्यवस्था निर्माण करता येईल. म्हणून तुझेच धम्मचक्र फिरे जगावरी! याचा सातत्याने प्रचार प्रसार केला तरच समाजात समता निर्माण करून भारताचे संविधानाला अपेक्षित प्रगल्भ समाज निर्माण करता येईल. करिता आपणास प्रयत्न करावे लागतील. या कार्यशाळेला प्रा. अरुण कांबळे, हिरामण अहिरे, धनराज गोंडाणे, अँड. विलास रामटेके, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.


## रि.पा.इ शहराध्यक्षपदी संगराज बिराजदार यांची निवड

सोलापूर/प्रतिनिधीः रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया व रि.पा.इ अल्पसंख्यांक विभागाची तातडीची बैठक सोलापूर संपर्क कार्यालय या ठिकाणी घेण्यात आली या बैठकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया सोलापूर शहर अध्यक्ष पदी श्री संगराज बिराजदार यांची ऐकमताने निवड करण्यात आली या वेळी बैठकीच्या अध्यक्ष पदी प्रदेश अध्यक्ष सुबोध वाघमोडे हे होते या वेळी जाक्कपा कांबळे माणिक आठवले रावसाहेब परीक्षाळे मारुती सोनवणे श्रीमंत गायकवाड धर्मा माने सलीम मुल्ला शिकदर शेख इम्रान शेख इब्राहिम शेख समिर मुजावर कल्लापा बनसोडे संगीता क्षीरसागर नसरीन शेख अमिना शेख पूनम मोरे राजश्री साबळे सचिन साबळे आम्रपाली तिरथे आदी प्रमुख पदाधीकारी उपस्थित होते




## बृहन्मुंबई हद्दीत ४ डिसेंबरपर्यंत जमावबंदी आदेश जारी

मुंबई : बृहन्मुंबई हद्दीत शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील अधिकारानुसार पोलीस उपआयुक्त (अभियान) यांनी बृहन्मुंबई हद्दीत ४ डिसेंबर २०२३ पर्यंत जमावबंदी आदेश जारी केला आहे.या आदेशानुसार पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींच्या कोणत्याही संमेलनास प्रतिबंध, मिरवणूक काढणे, मिरवणुकीत लाऊडस्पीकर, वाद्ये, वाद्य बँड आणि फटाके फोडण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. विवाह समारंभ, अंत्यविधी कार्यक्रम, कंपन्या, सहकारी संस्था आणि अन्य संस्था व संघटनांच्या कायदेशीर बैठका, क्लबमध्ये होणारे कार्यक्रम, सामाजिक मेळावे, सहकारी संस्था तसेच अन्य संघटना यांच्या बैठका यांना या बंदी आदेशातून वगळण्यात आले आहे.चित्रपटगृहे, नाट्यगृहे तसेच सार्वजनिक मनोरंजनाची अन्य ठिकाणे, न्यायालये, शासकीय, निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये तसेच अन्य शैक्षणिक संस्था, कंपन्या, कारखाने, दुकाने तसेच अन्य आस्थापनांमध्ये नियमित व्यापार, व्यवसाय या कारणांनी होणाऱ्या जमावास यातून वगळण्यात आले आहे. तसेच जमाव करण्यात तसेच शांततापूर्ण मार्गाने मोर्चास पोलिसांनी परवानगी दिलेली असल्यास त्यासही या जमावबंदीतून वगळण्यात आले आहे, असे पोलीस उपायुक्त विशाल ठाकूर यांनी आदेशान्वये कळविले आहे.




# कंटेहळ्ळीच्या नूतन सरपंच दिव्याताई येडे व नूतन सदस्यांचा नागरी सत्कार

अक्कलकोट/प्रतिनिधीः ग्रामपंचायत पंचवार्षिक निवडणुकीत निवडून आलेल्या सरपंच दिव्याताई येडे यांच्यासह बिनविरोध सदस्यांचा भव्य नागरी सत्कार कंटेहळ्ळी (ता.अक्कलकोट)येथील सभामंडप येथे संपन्न झाला. प्रथम ग्रामदैवत बसवांना यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी फकीरा दलाचे महाराष्ट्र प्रमुख सतीश कसबे हे होते.यावेळी फकीरा दलाचे सोलापूर जिल्हा प्रमुख जयभाऊ पारखे, मातंग समाजाचे माजी सोलापूर जिल्हा अध्यक्ष युवराज पवार,वैदपाशा शेख,रासपचे जिल्हाध्यक्ष सुनील बंडगर,माजी नगरसेवक महेश हिंडोळे,माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी उपस्थित होते.




यावेळी सतीश कसबे बोलताना म्हणाले की,महात्मा फुलेच्या अगोदरही बसवेश्र्वराने महिलांना शूद्र मानले जात होते.अशा वेळेस समतेचा संदेश देऊन त्यांना शिक्षणाची प्रेरणा दिली.व तीच प्रेरणा पुढे महात्मा फुले छत्रपती शाहू महाराज यांनी घेत महिलांना समानतेचा हक्क बजावीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून गौरव केला. या सर्व महामानवांना जो अभिप्रेत असलेला समाज या शिक्षण चळवळ व आरक्षणाच्या माध्यमातून समतोल राखण्यास प्रयत्न केला. तसेच मला या ठिकाणी महात्मा बसवेश्र्वराच्या अनुभव मंडपाची आठवण होत असल्याचे म्हणाले.

यावेळी मातंग समाजाचे अध्यक्ष निवृत्ती पारखे, भीम-अण्णा संघटना धाराशिव जिल्हाध्यक्ष विद्यासागर ढोबळे,रामवाडी ग्रां.पं.सदस्य सागर कसबे,राष्ट्रवादी काँग्रेस पवई तालुका अध्यक्ष सतीश बनसोडे,लहुजी शक्ती सेना तालुका अध्यक्ष राहुल ढोबळे,वंटे विलास कांबळे,राहुल बनसोडे उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी गोपाल बिराजदार,बिरप्पा बिराजदार,जगु बिराजदार, शपू जमादार,लक्ष्मण सोनटक्के,सिद्धया स्वामी,जगन्नाथ खंडू बिराजदार, क्षीरसागर दस्तगीर जमादार,श्रीमंत चेंडके,हणमंत वाघे,संजय बिराजदार,बंदेनवाज जमादार,मेहबूब जमादार,अप्पू चेंडके अर्जुन चेंडके यांनी घेतले.या कार्यक्रमास समाज बांधव,कार्यकर्ते व मित्र परिवारासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वामी यांनी केले तर आभार नूतन सरपंच दिव्याताई येडे यांनी केले.

## मंगळावेढा तालुक्याच्या दक्षिण भागात म्हैसाळचे पाणी पुन्हा दाखल

पंढरपूर/प्रतिनिधीः म्हैसाळ उपसा सिंचन योजनेअंतर्गत मंगळवेढा तालुक्यातील लोणार ममदाबाद पडोळकरवाडी शिरनांदगी मारोळी जंगल की सलगर बुद्रुक बावची पोट आजबेवाडी कालवा सल्लागार समितीची बैठक सांगली येथे पार पडली होती सदर बैठकीमध्ये पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी म्हैसाळ उपवास सिंचन पाणी योजना अंतर्गत मंगळवेढा तालुक्यासाठी सांगली जिल्हा जलसंपदा विभाग अंतर्गत म्हैसाळ खालील उपविभाग विक्री का क्रमांक दोन अन्वये तरतूद असणारी पाणी पूर्ण दाबाने देण्यात यावी त्याच्याबद्दल वरील भागांना या योजनेतून ज्या पद्धतीने पाणी मिळते त्याच पद्धतीने पाण्याची वाटप मंगळवेढा तालुक्यातील जनतेसाठी करण्यात यावी अशी मागणी केली होती.बैठकीमध्ये आमदार अवताडे यांच्या मागणीची दखल घेऊन हेड अंतर्गत मंगळा तालुक्यातील विविध गावांना या पाण्याची तरतूद करण्याची सांगली व सोलापूर जिल्हाधिकारी तसेच संभाजी विभागांना अभिषेक करण्यात आले होते बैठकीत ठरल्याप्रमाणे आमदार आवताडे यांच्या या मागणीला अखेर मोठे योजनेतून मंगळवेढा तालुक्यासाठी पाण्याचे आवर्तन सुरू झाले आहे सुरू झालेल्या या पाणी आवर्तन मध्ये विक्रीला क्रमांक दोन मधून चारोळी सलगर बुद्रुक सलगर जंगलगी ममदाबाद या गावांनी ९० किसेस पाणी मिळण्यास सुरुवात झाले आहे त्याचबरोबर अजबेवाडी शिवांगी लवंगी सलगर या गावांना पाणी येथे आठ दिवसात रोटेशन प्रमाणे येणार आहे तरी म्हैसाळ योजने अंतर्गत पाणी पोहोचलेल्या गावातील शेतकरी व नागरिकांनी या पाण्याचा लाभ घ्यावा असे आव्हान करण्यात आले आहे. म्हैसाळ उपसा जलसिंचन योजना उर्वरित रेल्वे वरळी चिखलगी भाऊची पोटी उर्वरित गावानं येत्या आठ ते दहा दिवसात पाणी पोचणार आहे असल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली आहे म्हैसाळ उपसा जलसिंचन पाणी योजनेतून या भागामध्ये पाणी असल्यामुळे गेल्या अनेक वर्ष सदर योजनेच्या पाण्याची प्रतीक्षा करत असलेल्या या भागातील जनतेला बळीराजाला आमदार संवाद समाधान आवताडे यांच्या कार्यतत्पर नेतृत्व शैलीमुळे पाण्याच्या रूपाने मोठा आधार निर्माण झाला आहे.



# उपमुख्यमंत्री तथा उर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांना महावितरण कंपनीच्या लाईनस्टाफ बचाव कृती समितीचे निवेदन

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर येथे कार्तिकी एकादशी पांडुरंगाची महापूजेसाठी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे उर्जामंत्री देवेंद्र फडणवीस आले असता त्यांना लाईनस्टाफ बचाव कृती समितीच्या वतीने सध्या महाराष्ट्र राज्यामध्ये लाईनस्टाफ (वायरमन) बांधवांचे आंदोलन दि. २० नोव्हेंबरपासून सुरू आहे त्यामध्ये महावितरण कंपनीतील लाईनस्टाफ बांधवांचे जे ज्वलंत प्रश्न आहेत ते त्यांच्यासमोर मांडून याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी फडणवीस साहेबांनी त्या निवेदनावर योग्य कारवाईसाठी तात्काळ रिमार्क मारला आणि हे सर्व प्रश्न मार्गी लावतो असे आश्र्वासन दिले.



यावेळी देण्यात आलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, महावितरण कंपनीतील लाईनस्टाफ (वायरमन) यांना स्वतंत्र वेतनश्रेणी देण्यात यावी, महावितरण कंपनीमधील लाईनस्टाफ (वायरमन) यांची वर्ग ४ मधून वर्ग ३मध्ये वर्गीकरण करण्यात यावे. महावितरण कंपनीतील लाईनस्टाफ (वायरमन) यांना मागील करार पगारवाढ करारात नमूद असल्याप्रमाणे फरकासह वाढीव पेट्रोल भत्ता देण्यात यावा. महावितरण लाईनस्टाफ (वायरमन) यांचे कामाचे तास आणि स्वरूप निश्र्चित करण्यात यावे. तसेच महावितरण कंपनीतील वसुलीचे काम सांघीक स्वरूपाचे असल्याने जबाबदारी निश्र्चित करण्यात यावी. महावितरण कंपनीतील लाईनस्टाफ (वायरमन) यांना सुरक्षिततेची साधने व लाईन मेंटेशनकरिता योग्य ते साहित्य पुरविण्यात यावे, महावितरण कंपनीतील लाईनचे पोल, कंडक्टर हे जीर्ण व कमकुवत झालेले आहेत त्याचा परिणाम अपघात होत आहेत त्यामुळे त्याचे तात्काळ नुतनीकरण करण्यात यावे, महावितरण कंपनीमध्ये कंट्राटी पध्दतीने नोकर भरती न करता सरळसेवेद्वारेच भरती करण्यात यावी अशा अनेक मागण्यांचे निवेदन देण्यात आलेले आहे. त्यावर उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मकता दर्शविली असून त्यावर तोडगा काढणार असल्याचे आश्र्वासन दिलेले आहे.

यावेळी लाईनस्टाफ बचाव कृती समितीतील सदस्य जोतिराम रणदिवे, उमेश चव्हाण, आनंत टोपडेबुवा, गजानन राऊत, महावीर जाधव, पवन नेहरकर, समिर मुलाणी, राजकुमार काळे, आरिफ शेख, अनिल कोळी, गणेश रणदिवे, महेश कोतवाल, संभाजी रोकडे, अखील मुजावर, मोहन मोटे, संदिप आयरे, संतोष काशीद, कैलास पिंपळे, सिताराम लोखंडे, हंबीरराव शेळके, बलभीम घोडके यांच्यासह इतर लाईनस्टाफ समितीचे वायरमन सदस्य उपस्थित होते.

## मतदार नोंदणीसाठी २६ नोव्हेंबर रोजी विशेष शिबीराचे आयोजन

सातारा : मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. या अनुषंगाने २६२ सातारा विधानसभा मतदार संघातील तृतीयपंथी व देहविक्री करणाऱ्या महिला व दिव्यांग व्यक्ती तसेच विमुक्त व भटक्या जमातीमधील व्यक्ती यांची नावे मतदार यादीमध्ये समाविष्ठ होण्यासाठी २६ नोव्हेंबर रोजी विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्रांताधिकारी सुधाकर भोसले यांनी दिली आहे.या शिबीराचे आयोजन तहसील कार्यालय, सातारा व मतदार संघातील सर्व मतदान केंद्रावर आयोजित करण्यात आले आहे. तरी तृतीयपंथी व देहविक्री करणाऱ्या महिला व दिव्यांग तसेच विमुक्त व भटक्या जमातील व्यक्तींनी उपस्थित राहून आपली नावे मतदार यादीमध्ये समाविष्ठ करावीत, असे आवाहनही श्री. भोसले यांनी केले आहे.

# महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

## व्यवस्थापकिय संचालक मनिष सांगळे

सोलापूर/प्रतिनिधी: साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनां व प्रस्तावित योजना याबाबत माहिती दिली. तसेच योजनांचा लाभ घेण्यासाठी व्यवसाय निवड करताना, नवीन व नाविन्य पूर्ण व्यवसाय निवडीबाबत मार्गदर्शन करुन महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनिष सांगळे यांनी केले.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सभागृह,सोलापूर येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री. सांगळे बोलत होते. यावेळी मेळाव्याची सुरुवात मान्यवरांचे हस्ते दिप प्रज्वलन व महापुरुषांना अभिवादन करुन करण्यात आली. शाहीर नंदू पाटोळे यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला गाणे सादर केले.

सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत श्री.एल.ए. क्षिरसागर, जिल्हा व्यवस्थापक, धाराशिव व श्री.आर.एच. चव्हाण, जिल्हा व्यवस्थापक, सोलापूर यांचेवतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन माजी राज्यमंत्री उत्तम प्रकाश खंदारे व अनिल रा. म्हस्के, महाव्यस्थापक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (म), मुंबई हे उपस्थित होते. तसेच मेळाव्यासाठी जिल्हा सोलापूर व धाराशिव येथील समाजबांध, सामाजिक कार्यकर्ते व पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.व्यवस्थापकीय संचालक श्री. सांगळे यांनी महामंडळाचा पदभार स्विकारल्यापासून केलेल्या कामकाजाचा आढाव सादर केला. शासनाने महामंडळास ता. तुळजापूर जिल्हा धाराशिव येथे उपलब्ध करून दिलेल्या जमिन /जागेवर सुरू करण्यात येणाऱ्या युपीएससी/ एमपीएससी सेंटर व बहुउपयोगी प्रशिक्षण केंद्राबाबत उपस्थितांना मौल्यावान मार्गदर्शन केले.

माजी राज्यमंत्री उत्तम प्रकाश खंदारे यांनी बऱ्यांच बाबीवर प्रकाश टाकून महामंडळाच्या कामकाजामध्ये काही बदल करण्याबाबत सुचना केलेल्या आहेत, तसेच महामंडळाच्या कार्यात सदैव सोबत राहून महामंडळाच्या अडीअचणी, राजकीय बाजूने शासन दरबारी मांडणार असल्याची ग्वाही या प्रसंगी दिली.

प्रमुख पाहुणे अनिल रा. म्हस्के, महाव्यस्थापक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (म), मुंबई यांनी महामंडळामार्फत पुर्वी राबविण्यात येत असलेल्या साहित्यरत्न लोकशाहिर आणाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनू मध्ये बदल करून देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनपर रक्कमेत देखील मोठयाप्रमााणात वाढ करण्यात आल्याची माहिती दिली. तसेच एनएसएफडीसी योजना व त्यासाठी आवश्यक असलेली खंडहमी मिळणेसाठी व सर्व सुरू असलेल्या योजना व प्रस्तावित योजनां प्रभावी पणे सूरू राहण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा सुरू असल्याबाबत माहिती दिली. प्रस्ताविक भाषण प्रादेशिक व्यवस्थापक शि.ल. मांजरे, तद्नंतर सामाजिक कार्यकर्ते श्री. सतिश कसबे, धाराशिव, श्री. युवराज पवार, सोलापूर, श्री. सुनिल अवघडे, सोलापूर, श्री. विलास लोंढे, सोलापूर, श्रीमती प्रमिला झोंबाडे, सोलापूर, श्री. लखन गायकवाड, सोलापूर, श्री. राजन घाडगे, सोलापूर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच मनोगतामध्ये प्रामुख्याने जामिनदारांची अट शिथिल करण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे. तसेच महामंडळाचे लाभार्थी यशस्वी उद्योजक श्री. शंकर मोरे, धाराशिव व बालाजी खंदारे, सोलापूर यांची त्यांचे यशाबद्दल महामंडळाच्या योजनेबद्दल मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री एल.एल. क्षिरसागर जिल्हा व्यवस्थापक धाराशिव यांनी केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. भैरवनाथ कानडे सहशिक्षक चिकुंद्रा ता. तुळजापूर यांनी करून कार्यकमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी संवेदनशीलतेने प्रयत्न करा :ना.गिरीश महाजन

पुणे : ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनातर्फे अनेक योजना राबविण्यात येत असून अधिकाऱ्यांनी संवेदनशीलतेने आणि पूर्ण क्षमतेने या योजनांची अंमलबजावणी करावी, असे आवाहन राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी केले. यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी येथे ग्रामविकास व पंचायतराज विभागातर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपायुक्त (आस्थापना/विकास), अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्रकल्प संचालकांसाठी आयोजित राज्यस्तरीय प्रशिक्षण व कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.



कार्यक्रमाला यशदाचे महासंचालक एस.चोक्कलिंगम, ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना सचिव के.टी. पाटील, एमएसआरएलएमचे मुख्य कार्यकारी अधिकारी रुचेश जयवंशी, पंचायत राज संचालक आनंद भंडारी, ग्रामीण गृहनिर्माण संचालक डॉ.राजाराम दिघे, यशदाचे उपसंचालक मल्लिनाथ कलशेट्टी, विविध जिल्ह्यातील मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते.मंत्री श्री.महाजन म्हणाले, ग्रामीण भागातील लोकांचे जीवन सुसह्य करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजना आहेत. या योजनांसाठी मोठ्या प्रमाणात निधी दिला जात असताना अजूनही ग्रामीण भागातील शिक्षण, आरोग्याचे प्रश्र्न पूर्णतः सुटलेले नाही. ते सोडविण्यासाठी अधिकाऱ्यांनी संवेदनशीलतेने आणि कल्पकतेने काम करावे. गाव स्वच्छ आणि सुंदर होईल यासाठी गांभीर्याने प्रयत्न करावे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा प्रयत्न व्हावा. गावातील शैक्षणिक सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीविषयी अधिकाऱ्यांनी नियमित आढावा घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

पंचायत राज विभाग ग्रामीण भागाचा आत्मा असल्याचे नमूद करून श्री. महाजन म्हणाले, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून मोठ्या अपेक्षा आहेत. तंत्रज्ञानामुळे कामकाजात सुलभता येत असताना शाश्र्वत विकासाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी सुलभता झाली आहे. या तंत्रज्ञानाचा उपयोग करीत समाज आणि देशासाठी आपण काय योगदान देऊ शकू या भावनेने ग्रामीण माणसाचे जीवन सुसह्य करण्यासाठी अधिकाऱ्यांनी काम करावे. कार्यशाळेच्या माध्यमातून विचारांचे आदानप्रदान होईल आणि त्याचा फायदा ग्रामीण भागासाठी होईल असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अभिनव कल्पना राज्यस्तरावर राबविण्यासाठी सर्व सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही श्री.महाजन यांनी दिली.

महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी ‘उमेद’सारखी महत्वाची योजना राबविण्यात येत आहे. महिला बचत गटांच्या माध्यमातून चांगले काम होत आहे. गरीब माणसाला हक्काचे घर देण्यासाठी घरकुल योजना आहे. अशा विविध योजनांचा माध्यमातून शेवटच्या माणसापर्यंत पोहोचण्याचे, त्याला त्याच्या हक्कच्या मूलभूत सुविधा आणि त्याचे जीवनमान उंचाण्याचे कार्य ग्रामविकास आणि पंचायत राज विभागाच्या माध्यमातून व्हावे, अशी अपेक्षा मंत्री श्री.महाजन यांनी व्यक्त केली.प्रधान सचिव श्री.डवले यांनी कार्यशाळेविषयी माहिती दिली. ते म्हणाले, ग्रामविकास विभागाच्या कामकाजात येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी शिकण्याची प्रक्रिया सुलभ करण्याच्यादृष्टीने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कामकाज सुलभीकरण, संगणकीकरण आणि विविध शासकीय योजनांच्या अभिसरणाबाबतही चर्चा करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील शेवटच्या माणसाला शासकीय योजनांचा लाभ देण्याची भावना विकसित करण्याच्यादृष्टीने कार्यशाळेकडे पाहावे, असे आवाहन त्यांनी केले.तीन दिवस चालणाऱ्या या कार्यशाळेत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद), ग्रामीण गृहनिर्माण, पंचायतराज, राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान, त्रिस्तरीय विकास आराखडे, विविध योजनांचे अभिसरण-महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना, राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजना, प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्रामीण सडक योजना व इतर योजनांची अंमलबजावणी, गुणवत्तापूर्ण शिक्षण, स्वच्छ शाळा-सुंदर शाळा, शाळा विकासासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम, शाश्र्वत विकास ध्येये, पंचायत विकास निर्देशांक, पर्यावरणपुरक ग्रामीण विकास, प्रशासनातील नैतिकता व नितीमत्ता आदी विविध विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. विविध जिल्ह्यांचे नाविन्यपूर्ण उपक्रम व यशोगाथांचे सादरीकरणही यादरम्यान करण्यात येईल. जिल्हा परिषदेतील प्रशासकीय बाबींसंदर्भातही कार्यशाळेत विचारमंथन करण्यात येणार आहे.

# माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या कन्येचा शाही विवाह सोहळा संपन्न, दिग्गज मान्यवरानी दिले शुभाशिर्वाद



अक्कलकोट/प्रतिनिधी: राज्याचे माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांची कन्या चि.सौ.का.स्नेहल आणि बसवराज पाटील यांचे चिरंजीव मंजूनाथ (रा.गुलबर्गा) यांचा शाही विवाह सोहळा बुधवार दि.२३ नोव्हेंबर रोजी सोलापूर येथे संपन्न झाला. सायंकाळी स्वागत समारंभ पार पडला.प्रारंभी सकाळी ९ वाजून ५६ मिनिटांनी विविध मठाधिपती आणि प्रमुख अतिथींच्या उपस्थितीत अक्षता सोहळा पार पडला होता

त्यानंतर याचा विवाह सोहळ्याचा स्वागत समारंभ कर्मयोगी अप्पासाहेब काडादी फंक्शन हॉल सिद्धेश्र्वर साखर कारखाना सोलापुर येथे आयोजित केला होता.यावेळी आलेल्या सर्व मुख अतिथी व मान्यवरांचे स्वागत माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे, युवा नेते शिवराज म्हेत्रे,शीतल म्हेत्रे,प्रथमेश म्हेत्रे,लक्ष्मी म्हेत्रे,डॉ.उदय म्हेत्रे,मल्लिनाथ म्हेत्रे, अशपाक बळोरगी,मल्लिकार्जुन पाटील,सिद्धार्थ गायकवाड,बाबासाहेब पाटील,रईस टिनवाला हे करत होते.या सोहळ्याला माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे,काशी पिठाचे जगद्गुरू डॉ.मल्लिकार्जुन विश्र्वराध्य शिवाचार्य महास्वामीजी,खासदार डॉ.जयसिद्धेश्र्वर महास्वामीजी,तुमकुर मठाचे ष. ब्र.१०८ गंगाधर शिवाचार्य महास्वामीजी,जेष्ठ नेत्या उज्वलाताई शिंदे,आमदार प्रणिती शिंदे,आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, सिद्धेश्र्वर कारखान्याचे मार्गदर्शक संचालक धर्मराज काडादी,आमदार राजेंद्र राऊत,माजी मंत्री मधुकर चव्हाण,बसवराज पाटील,माजी आमदार दिलीप माने,शिवशरण पाटील, राजन पाटील,धनाजी साठे,गोकुळ शुगरचे चेअरमन दत्ता शिंदे,रोहन परिचारक,बीडच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ,शिवसेनेचे धाराशिव जिल्हा सह संपर्क प्रमुख शंकर बोरकर,व्ही.पी शुगरचे व्ही.पी पाटील , स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख अमोलराजे भोसले,महेश इंगळे,मनोहर सपाटे,प्रकाश वाले, संजय हेमगड्डी,श्रीशैल नरोळे,बाळासाहेब शेळके,विनोद भोसले,मिलन कल्याणशेट्टी,सुदीप चाकोते,चेतन नरोटे,महेश गादेकर, सुरेश हसापुरे,महेश हिंडोळे,बाळासाहेब मोरे,मल्लिनाथ स्वामी,लाला राठोड,अभय खोबरे,बसवराज बाणेगाव,धनेश अचलारे,गणेश डोंगरे,अंबादास करगुळे,पंडित सातपुते, बसवराज म्हेत्रे,

राज सलगर,गुरु म्हेत्रे,सातलींग शटगार,व्यंकट मोरे,विश्र्वनाथ भरमशेट्टी,शाहु सलगर,काशिनाथ कुंभार,मुबारक कोरबू,मोहन देडे आदींसह अक्कलकोट, दक्षिण सोलापूर,उत्तर सोलापूर तसेच सोलापूर शहरातील विविध मान्यवर,विविध गावचे सरपंच,सोसायटीचे चेअरमन,कॉंग्रेसचे पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.जिल्हा वीरशैव माळी संघटनेचे पदाधिकारी व सिद्धाराम शंकर प्रतिष्ठानच्या कर्मचाऱ्यांनी या विवाह सोहळ्यासाठी परिश्रम घेतले.

# श्री नाथ संस्थानचा पैठणक्षेत्री ‘महाभागवत’ पुरस्काराने सरसंघचालकांचे हस्ते औसेकर महाराजांचा गौरव

पंढरपूर/प्रतिनिधी: जवळपास दोन शतकाहून अधिक काळापासून नाथषष्ठी उत्सवाची परंपरा-जतन करुन वृध्दींगत करीत भारतासह पाश्र्चात्य देशामध्ये पोहोंचवणाऱ्या औशयाच्या श्री. नाथ संस्थानच्या अद्वैत धर्मपिठास महाभागवत पुरस्कार' सरसंघचालक डॉ. श्री. मोहनजी भागवत यांचे हस्ते नाथांच्या पैठणक्षेत्री दि. २१ नोव्हेंबर रोजी प्रदान करण्यात आला. संत एकनाथांच्या दरबारी पैठण इथे श्री. नाथ संस्थानचे पाचवे पिठाधिपती सद्गुरु श्री. गुरुबाबा महाराज औसेकर व पंढरपूर येथील श्री. विठ्ठल रुक्मीणी मंदीर देवस्थान समितीचे सहअध्यक्ष तथा नाथ संस्थान औसाचे अध्यक्ष सद्गुरु श्री. गहिनीनाथ महाराज औसेकर या बंधुद्वयांचा सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या हस्ते पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला.



औशयाचे श्री. नाथषष्ठी उत्सवाची मोठी जुनी परंपरा आहे. नाथसंस्थानचे मुळ सत्पुरुष सद्गुरु श्री. वीरनाथ महाराज यांना

दत्तात्रय आज्ञा जनार्धनासी ।
जनार्धन आज्ञा नाथासी ।
गुंडा आज्ञा वीरासी ।
नाथषष्ठी कराया ।।

या वचनाप्रमाणे सद्गुरु गुरु गुंडा महाराजांचेकडून शके १७१८ मध्ये उत्सव प्रसाद प्राप्त झाला, तेंव्हापासून सलग २२७ वर्ष अखंडपणे प्रतिवर्षी नाथसंस्थान हा नाथषष्ठीचा उत्सव साजरा करते. केवळ महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा, गुजरात (द्वारका), तामिळनाडू (रामेश्र्वर), उत्तरप्रदेश (वाराणसी-काशी) इथे सद्गुरु परंपरेची, सद्गुरु मल्लनाथ महाराज, सद्गुरु दासवीरनाथ महाराज, सद्गुरु ज्ञानेश्र्वर महाराज यांनी नाथषष्ठी उत्सव केला, आता हीच परंपरा नंतर सद्गुरु गुरुबाबा महाराज आणि सद्गुरु श्री. गहिनीनाथ महाराज यांनी अत्यंत श्रृध्देने परिश्रमपुर्वक जपली वाढवली आहे. नाथांची जवळपास १६० मंदीरे नाथसंस्थानने उभारली आहेत. नाथषष्ठी उत्सवात नाथांची स्थापना, पुजन, नामसंकिर्तन, ज्ञानेश्र्वरी, गाथा, भागवतांची पारायणे, संस्थानची साधना असणारे, प्रासादिक चक्रीभजन, प्रवचन, किर्तनातून नाम- गुरुसेवा, नाथांची शिकवण, संस्कार रुजवण्याचे अन्याहतपणे कार्य सुरु आहे.

नाथसंस्थानच्या या भक्तीयोगदानाची दखल शांतीब्रम्ह श्री. संत एकनाथ महाराज समाधी चतुःशतकोत्तर रौप्य महोत्सव तथा ग्रंथकौस्तुभ श्री. एकनाथी भागवत जयंती चतुःशतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त श्री. संत एकनाथ महाराजांचे १४ वे वंशज ह.भ.प.श्री. योगीराज महाराज गोसावी व श्री.संत एकनाथ महाराज शिष्य परिवार पैठणकर फडाच्या वतीने सरसंघचालक डॉ.श्री. मोहनजी भागवत यांच्या शुभहस्ते नाथ संस्थानच्या औसेकर महाराजांना 'महाभागवत पुरस्काराने' सन्मानीत करण्यात आले आहे.या ऐतिहासिक अध्यात्मिक सोहळ्यास केंद्रीय मंत्री श्री. रावसाहेब दानवे, श्री. डॉ. भागवत कराड, छत्रपती संभाजी नगरचे पालकमंत्री श्री. संदिपान भुमरे, महामंडळेश्र्वर शांतीगीरी महाराज, राजेंद्र महाराज ये प्रे. श्रीराम महाराज झिंझुरके, सरदार महाराज गोसावी, मा.आमदार श्री. हरिभाऊ बागडे यांचेसह किर्तनकार, प्रवचनकार, नाथभक्त, वारकरी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

# कार्तिक यात्रा समताज पंढरी त स्वच्छतेच्या कामाला वेग



पंढरपूर/प्रतिनिधी:दोन दिवसात संपूर्ण शहर स्वच्छ करण्याचा प्रयत्न मुख्याधिकारी ड्रॉ प्रशांत जाधव पंढरपूर शहरामध्ये दि २३ नोव्हेंबर २०२३ रोजी एकादशी सोहळा संपन्न झाला कार्तिक यात्रा कालावधीमध्ये पंढपुरात श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पर राज्यासह राज्यातील व इतर जिल्ह्यातून अधिक भाविक मोठ्या प्रमाणात दाखल झाले होते यात्रा कालावधीत सुमारे पाच ते सहा लाख वारकरी भावी दर्शनासाठी आले होते या येणाऱ्या भाविकांना आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या यात्रा संपण्याच्या मार्गावर असताना पंढरपूर शहर लवकरात लवकर स्वच्छ होण्याच्या दृष्टीने विशेष स्वच्छता मोहीम हाती घेतली असल्याची माहिती ड्रॉ प्रशांत जाधव यांनी दिली

कार्तिक यात्रा कालावधीमध्ये मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपूर शहरांमध्ये दाखल झाले होते यामध्ये प्रामुख्याने ६५ एकर नदीपात्रात वाळवंट प्रदक्षणा मार्ग दर्शन बारी पत्रा शेड गोपाळपूर रोड मंदिर परिसर व शहरात मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती भाविकांची संख्या जास्त असल्याने वाहने प्रदक्षणा मार्ग व इतर ठिकाणी जात नसल्याने मठामध्ये कचरा गोळा करण्यास मोठ्या अडचणी निर्माण होत होत्या कधी कमी होतात एकादशीच्या रात्रीपासून २४ तास स्वच्छता करण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू होते वासटेकर दर्शन बारी पत्रा शेड वाळवंट इत्यादी ठिकाणी स्वच्छता मोहीम चालू होती

१३०० तेराशे कर्मचारी ३५० कायमचे कर्मचारी व ९५० हंगामी कर्मचारी पालिकेकडून स्वच्छता ठेवण्यासाठी कर्मचारी नेमण्यात आले आहेत. तसेच ६५ एकर नदीपात्र वाळवंट प्रदक्षणा मार्ग दर्शन बारी पत्रा शेड गोपाळपूर रोड मंदिर परिसर आधी ठिकाणी जंतुनाशक फवारण्यास मॅरेथॉन पावडर ब्लिचिंग पावडर वेळोवेळी टाकण्यात येत आहे घाण कचरा व्यवस्थापन ४१ घंटागाडी द्वारे ही कचरा गोळा करण्याची काम चालू आहे शहरांमधील कचरा त्वरित उचलण्यासाठी आरोग्य विभागातील चार टिपर दोन कंपोझिटर एक चार डम्पिंग ट्रॅक्टर साह्याने दररोज सत्तर ते शंभर टन कचरा उचलण्यात येत आहे साह्याने दररोज स्थानिक नागरिकांनी व भाविकांनी आरोग्य स्वस्तिक राहण्यासाठी नगरपालिका प्रशासक कार्यकर्ते असे असतानाही मुख्याधिकारी ड्रॉ प्रशांत जाधव यांनी यावेळी केली आहे

यात्रा व्यवस्थित पार पाडावी म्हणून उपविभागी अधिकारी तथा पंढरपूर नगरपरिषदेचे प्रशासक गजानन गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याधिकारी ड्रॉ प्रशांत जाधव उपमुख्य अधिकारी अँड सुनील वाळूजकर आरोग्य अधिकारी शरद वाघमोडे आरोग्य निरीक्षक नागनाथ तोडकर पंढरपूर नगरपालिकेचे नगर अभियंता पवार साहेब व सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी प्रयत्नशील आहेत